अॅन्टी करप्शन ब्युरो

# सापळा केस

दिनांक १३/०१/२०१९

**जिल्हा शासकीय रूग्णालय परभणी येथील डॉक्टर गजानन एस.काळे यांना व त्यांचे खाजगी रूग्णालयातील कम्पाउंडर पांडुरंग डुकरे यांना ८०००/— रू. लाच घेताना पकडण्यात आले.**

यातील तक्रारदार यांनी असेबी कार्यालय परभणी येथे दि.१२/१/२०१९ रोजी समक्ष हजर राहुन तक्रार दिली की, त्यांचे आईचे पायाला फ्रॅक्चर झाल्याने उपचार करण्यासाठी जिल्हा शासकीय रूग्णालय परभणी येथे दाखल केले असता तेथील डॉ.काळे, वैदयकीय अधिकारी हे त्यांचे आईचे पायाला रॉड टाकून शस्त्रक्रिया करण्यासाठी ८,०००/— रूपये लाचेची मागणी करीत आहेत. त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.

त्यानुसार ब्युरो कडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक १२/०१/२०१९ रोजी जिल्हा शासकीय रूग्णालय परभणी येथील डॉ.गजानन काळे,वैदयकीय अधिकारी, वर्ग —२ यांनी तक्रारदार यांचे आईचे पायाला रॉड टाकून शस्त्रक्रिया करण्यासाठी ८,०००/— रूपये लाचेची मागणी करून, दि.१३/०१/२०१९ रोजी सकाळी रोशनखान मोहल्ला परभणी येथील त्यांचे खाजगी रूग्णालयातील कम्पाउंडर पांडुरंग डुकरे यांचे मार्फत स्विकारली असता त्यांना पकडण्यात आले. लाचेची रक्कम ८,०००/— रू कम्पाउंडर पांडुरंग डुकरे यांचे ताब्यातून हस्तगत करण्यात आली आहे. डॉ.गजानन काळे,वैदयकीय अधिकारी व कम्पाउंडर पांडुरंग डुकरे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरूध्द पो.स्टे.नानलपेठ येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक श्री.संजय लाटकर,नांदेड परिक्षेत्र नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री.नुरमहंमद शेख, अपर पोलीस अधिक्षक, श्री.अनिल गव्हाणकर, पोलीस निरीक्षक, श्री.विवेकानंद भारती पोलीस निरीक्षक, पोह/लक्ष्मण मुरकुटे, पोशि/अविनाश पवार, पोना/अनिल कटारे, पोना/मुखीद, पोना सचिन गुरसुडकर, पोह/चौधरी, मपोशि/टेहेरे अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी लाचखोर भ्रष्टाचारी लोकसेवकां विरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा—या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या कमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन लाचलुंचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांचेकडून केले आहे.

**दुरध्वनी कमांक ०२४५२—२२०५९७**

**टोल फ्री कमांक १०६४**

**Email ID - dyspacbparbhani@gmail.com**

श्री.संजय लाटकर,पोलीस अधिक्षक,ला.प्र.वि.नांदेड, परिक्षेत्र नांदेड — ९८२३०२८१२२

श्री.नुरमहंमद शेख, अपर पोलीस अधिक्षक — ९८२३३९०३३३

श्री.गजानन विखे, पोलीस उप अधिक्षक — ९९२२५४७८९८

श्री.अनिल गव्हाणकर,पोलीस निरीक्षक — ९८२३६१६१४५

श्री.विवेकानंद भारती, पोलीस निरीक्षक — ९४२३४२९७८६

(अनिल गव्हाणकर)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो परभणी

Scanned by CamScanner